
# मराठी व्याकरण: अलंकार

अलंकार म्हणजे भूषणे, दागिने. शरीर शोभायमान दिसण्यासाठी अंगावर दागिने घालतात. शरीराची शोभा दागिने अधिक खुलवतात. आपली भाषा सुंदर व्हावी, म्हणून भाषेतही भूषणांचा, अलंकारांचा उपयोग कवि आणि लेखक करत असतात. विशेषत: पद्यात अलंकार अधिक शोभून दिसतात. गद्यसुद्धा अलंकारांनी सुंदर दिसते. 'मुख सुंदर दिसते' किंवा 'मुख सुंदर आहे' ही साधी (गद्य) वाक्ये झाली; 'परंतु 'मुख कमलासारखे सुंदर आहे' किंवा 'मुख जणू कमलच आहे' असे म्हटले तर ते अधिक सुंदर दिसते. यालाच अलंकारिक भाषा म्हणतात. अलंकारिक भाषण किंवा अलंकारिक लेखन सर्वांना आवडते. त्यांत एक प्रकारची चमत्कृती दिसते व मन आनंदित होते.

पद्यामध्ये शब्दांची किंवा अक्षरांची पुनरुक्ती असली, की त्यामध्ये नादमाधुर्य येते. अशा शब्दचमत्कृतीची पद्यात योजना असली, तर त्या पद्यात 'शब्दालंकार' असतो. पद्यात अर्थचमत्कृती प्रामुख्याने असली, तर त्या पद्यात, 'अर्थालंकार' असतो.

अलंकारांचे 'शब्दालंकार' आणि 'अर्थालंकार' असे दोन मुख्य प्रकार आहेत.


अलंकार
शब्दालंकार
अर्थालंकार
अनुप्रास
यमक
श्लेष
उपमा
उत्प्रेक्षा
व्यतिरेक
अतिशयोक्ती
दृष्टान्त
स्वभावोक्ती
विरोधाभास

1. **शब्दालंकार :**

जे अलंकार शब्दांच्या केवळ विशिष्ट रचनेवरच अवलंबून असतात, शब्दांची चमत्कृती शब्दांचा अर्थ आणि शब्दयोजना यांच्यावर आधारीत अलंकारांना 'शब्दालंकार' म्हणतात.

प्रकार-

i. **<u>अनुप्रास</u>** – कवितेच्या चरणात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे जेव्हा सौंदर्य प्राप्त होते तेव्हा अनुप्रास अलंकार होतो.
उदा. गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले,
शीतल तनु चपल चरण अनिलगण निघाले
( गडद गडद जलदची पुनरावृत्ती)

ii. <u>**यमक**</u> - शब्दालंकाराचे अनेक प्रकार आहेत. त्यांत 'यमक' हा अलंकार महत्वाचा आहे. एखादा शब्द किंवा अक्षर पुनःपुन्हा पद्यात चरणांती आले, की तेथे 'यमक' हा अलंकार होतो.

उदा.

1. मना चंदनाचे परी त्वा झिजावे |
   परी अंतरी सज्जना नीववावे ||
2. या वैभवाला तुझ्या पाहुनिया, मला स्फूर्ति नृत्यार्थ होते जरी |
   सामर्थ्य नामी तुझ्या जन्मभूमी, तसे पहिले मी न कोठे तरी |

अशा शब्दांनी नादमाधुर्य निर्माण झालेल्या पद्यपंक्ती तुमच्या पाठ्यपुस्तकातील कवितांतून निवडून काढा.

iii. <u>**श्लेष**</u> - एकच शब्द वाक्यात दोन अर्थांनी वापरल्यामुळे जेव्हा शब्दचमत्कृती निर्माण होते तेव्हा 'श्लेष' हा अलंकार होतो.

उदा.

1. मित्राच्या उद्याने कोणास आनंद होत नाही. (मित्र = सखा, मित्र = सूर्य)
2. श्रीकृष्ण नवरा मी नवरी |
   शिशुपाल नवरा मी न-वरी ||

## 2. अर्थालंकार :

दोन सुंदर वस्तूंमधील साम्य दर्शवून पद्यामध्ये अर्थचमत्कृती आणली जाते. तेथे अर्थालंकार होतो. बहुतेक अर्थालंकार अशा साम्यावर आधारित असतात. त्यात चार गोष्टी महत्वाच्या असतात.

A. ज्या गोष्टीचे वर्णन कवी करत असतो, तिला अलंकारात 'उपमेय' असे म्हणतात. 'मुख कमलासारखे सुंदर आहे' या वाक्यामध्ये मुखाचे वर्णन कवी करत आहे, म्हणून 'मुख' हे 'उपमेय' आहे.

B. उपमेयाचे साम्य ज्या दुसऱ्या गोष्टीशी कवी दाखवतात, तिला 'उपमान' असे म्हणतात. वरील वाक्यात मुखाचे साम्य कमलाशी दाखवले आहे, म्हणून 'कमल' हे तेथे 'उपमान' आहे.

C. उपमेय आणि उपमान यांमधील साम्य दर्शवणाऱ्या गुणधर्माला 'साधर्म्य' किंवा 'समान धर्म' असे म्हणतात. वाक्यात उपमेय 'मुख' आणि उपमान 'कमळ' यांमध्ये साम्य दाखवणारा गुण सुंदरता हा आहे.

D. उपमेय आणि उपमान यांमधील साम्य दर्शवणाऱ्या शब्दाला 'साधर्म्यसूचक शब्द' किंवा 'साम्यसूचक शब्द' म्हणतात.

वरील वाक्यात 'कामलासारखे मुख' यातील 'सारखे' हा 'साधर्म्यसूचक' शब्द आहे.

१)उपमा:

दोन वस्तू मधील साधर्म्य दाखविण्यासाठी सम, समान, सारखा, प्रमाणे, परी, परिस सारख्या शब्दांचा वापर केल्यास उपमा अलंकार होतो.

अ)सवल रंग तुझा पावसाळी नभापरी.

ब)असेल तेथे वाहत सुंदर दुधारखी नदी.

क)मुंबई ची घरे मात्र लहान कबुतराच्या खुराड्यासारखी.

२)उत्प्रेक्षा:

उपमेय हे जणू उपमानच आहे हे दर्शवण्यासाठी जणू, जणुकाय,गमे, वाटे, भासे, की यासारखे शब्द वापरले जातात तेव्हा उत्प्रेक्षा अलंकार होतो.

अ)हा आंबा जणू साखरच!

ब)त्याचे अक्षर जणू काय मोतीच!

क)ती गुलाबी उषा म्हणजे परमेश्वराचे प्रेम जणू!

ड)आकाशातील चांदण्या जणू फुलांची पखरण!

३): रूपक:

जेव्हा उपमेय आणि उपमान यात भेद नसून दोन्ही एकरूप आहेत असे दर्शविले जाते तेव्हा रूपक अलंकार होतो.

अ)देह देवाचे मंदिल | आत आत्मा परमेश्वर

ब)वाघिणीचे दुध प्याला,वाघबच्चे फाकडे ||